राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर
१५ वा वित्त आयोग अंतर्गत UHWC व आपला दवाखाना वैद्यकिय अधिकारी
पदाकरिता कंत्राटी तत्वावर पदभरतीबाबत

# सर्व UHWC व Apala Dawakhana वैद्यकिय अधिकारी पदासाठी अर्जदारांकरिता सुचना दि.१३/०३/२०२४

1) UHWC व Apala Dawakhana मधील वैद्यकिय अधिकारी पद हे MBBS अर्हताधारकाकरिता आहे. MBBS अर्हताधारक उमेदवार प्राप्त न झाल्यास, सदर MBBS पदावर UHWC व Apala Dawakhana करिता BAMS पदवीधारक यांना रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती Merit List नुसार देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२) मा.सहसंचालक (अतांत्रिक) रा.आ.अ.मुंबई यांचे पत्र दिनांक ०९/०६/२०२३ अन्वये अति विशेष तज्ञ, विशेष तज्ञ, वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) या पदाकरिता पदभरती Walk in Interview व्दारे घेण्याचे सुचित करण्यात आलेले आहे. अति विशेष तज्ञ, विशेष तज्ञ, वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) सोडुन इतर पदांची नियुक्ती गुणांकन (Merit) पध्दतीने पदभरती प्रक्रिया राबवुन घेण्यात यावी,अशा सुचना प्राप्त आहेत. त्यामुळे BAMS अर्हताधारक यांची प्रत्यक्ष मुलाखत न घेता गुणांकन (Merit) यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार रिक्त पदांवर MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ६ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात BAMS अहर्ताधारकास नियुक्ती देण्यात येईल.

३) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी फक्त MBBS उमेदवारांकरिता Walk in Interview राहतील BAMS उमेदवारांच्या जागी MBBS उमेदवार प्राप्त झाल्यानंतर BAMS उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल व त्याकरिता वेगळी पुर्वसुचना या कार्यालयाव्दारे देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

४) प्रकाशित जाहीरातीप्रमाणे दिनांक १२/०३/२०२४ रोजी दुसऱ्या मंगळवारी घेण्यात आलेल्या UHWC व आपला दवाखानाच्या वैद्यकिय अधिकारी पदाकरिता MBBS उमेदवारांच्या Walk in Interview करिता एकुण १० MBBS उमेदवार हजर होते. सदर पदांकरिता MBBS उमेदवारांची निवड प्रक्रिया सुरु असुन, उर्वरित राहणाऱ्या रिक्त पदाकरिता BAMS उमेदवारांची या कार्यालयास प्राप्त अर्जानुसार UHWC Merit List तथा आपला दवाखाना Merit List अशा दोन वेगवेगळया Merit List तयार करण्यात आल्या आहेत. व त्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.nagpurzp.com) प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर यादीवर आक्षेप असल्यास दिनांक १८/०३/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत आक्षेप लेखी स्वरुपात सादर करावे व उमेदवारांकडुन आक्षेपाची पुर्तता केल्यानंतर अंतिम यादी Merit List या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येईल. प्रकाशित जाहीरातीच्या आधारे पात्र उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५) दिनांक २१/०२/२०२४ रोजी UHWC व दिनांक १७/०२/२०२४ रोजी आपला दवाखाना वैद्यकिय अधिकारी पदाकरिता जाहीरात प्रकाशित करण्यात आलेली आहे **सदर जाहीरातीमध्ये वैद्यकिय अधिकारी पदाकरिता उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी Walk in Interview घेण्यात येईल** असे नमुद करण्यात आलेले आहे. सदर नमुद Walk in Interview हे केवळ MBBS उमेदवारांकरिता असुन BAMS उमेदवारांकरिता Merit List प्रमाणेच पदभरती करण्यात येईल याची नोंद घेण्यात येईल.

आदेशान्वये
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर